**पीपल भास्कर** **अनिल अग्रवाल**  | वेदांता समूहाचे संस्थापक व अध्यक्ष

# वॉरेन बफेपेक्षा जास्त नफा देतेय 'मेटल किंग' अनिल यांची कंपनी, २० देशांमध्ये व्यवसाय

१९७३ चा सुमार. तेव्हा ते तरुण होते. १९ वर्षांचे होते. हातात टिफिन बॉक्स आणि बेड घेऊन ते पाटण्याहून मुंबईला आले. त्यानंतर त्यांनी पहिल्यांदाच मुंबईची काळी-पिवळी टॅक्सी व डबल डेकर बस पाहिली, पण त्यांच्या डोळ्यात मोठी स्वप्ने होती. म्हणून त्यांनी व्यवसायासाठी प्रयत्न सुरू केले. तथापि, सुरुवातीचा संघर्ष इतका होता की, १० पैकी ९ व्यवसाय अयशस्वी झाले. परंतु, दहाव्या प्रयत्नात त्यांना मोठे यश मिळाले. ही व्यक्ती म्हणजे वेदांता ग्रुपचे संस्थापक अनिल अग्रवाल, त्यांना आज जग 'मेटल किंग' म्हणून ओळखते.

ते वयाच्या १९ व्या वर्षी भंगार व्यापारी झाले. १९७६ मध्ये वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी मित्रांकडून, नातेवाइकांकडून थोडे पैसे घेतले आणि बँकेकडून कर्ज घेऊन सुमारे १६ लाख रुपयांना शमशेर स्टर्लिंग कॉर्पोरेशन विकत घेतले. ही कंपनी इनॅमेल्ड कॉपर बनवते. त्यानंतर त्यांनी १९८६ मध्ये स्टरलाइट इंडस्ट्रीजची स्थापना केली. ही भारतातील पहिली खासगी टेलिकॉम केबल उत्पादन कंपनी होती, परंतु बाल्को व हिंदुस्तान झिंकसारख्या तोट्यात चालणाऱ्या सरकारी कंपन्या विकत घेऊन त्यांचा कायापालट केला तेव्हा खरी झेप तेव्हा घेतली. २००३ मध्ये त्यांनी लंडनमध्ये वेदांता रिसोर्सेसची स्थापना केली, ती फायनान्शियल टाइम्स स्टॉक एक्सचेंज - १०० वर नोंदणीकृत होणारी पहिली भारतीय वंशाची कंपनी बनली. आज वेदांता भारतासह २० हून अधिक देशांत आहे. अलीकडील मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्यांच्या वेदांता ग्रुपने काही प्रकरणांत वॉरेन बफेंच्या बर्कशायर हॅथवेपेक्षा जास्त नफा दिला आहे.

**चर्चेत का? - वेदांताच्या २०२५ च्या डिमर्जर योजनेसाठी राष्ट्रीय कंपनी कायदा अपिलीय न्यायाधिकरणाकडून कंपनीला दिलासा मिळाला.**



**जन्म :** १ ऑक्टोबर १९५४ (७१ वर्षे), पाटणा

**शिक्षण :** मिलर हायस्कूल पाटणा - शालेय

**कुटुंब :** पत्नी- किरण अग्रवाल, दोन अपत्ये- मुलगा अग्निवेश, मुलगी - प्रिया अग्रवाल।

**संपत्ती :** ३८,४६८ कोटी रु.

(फोर्ब्जनुसार अनिल अग्रवाल आणि त्यांच्या कुटुंबाची एकूण मालमत्ता)

**२००८** मध्ये अर्न्स्ट अँड यंगने वर्षातील सर्वोत्तम उद्योजक पुरस्कार दिला

**२०२१** मध्ये गिव्हिंग प्लेजवर स्वाक्षरी केली, त्यांच्या संपत्तीपैकी ७५ टक्के दान करण्याची घोषणा केली.

## दलाल स्ट्रीटचे जादूगार : ₹१००० कोटींचे ७० हजार कोटींमध्ये रूपांतर

२००२ मध्ये वेदांताने (त्या वेळी स्टरलाइट इंडस्ट्रीज म्हणून काम करत होते) हिंदुस्तान झिंकमधील २६% हिस्सा विकत घेतला. कंपनीने हिंदुस्तान झिंकसाठी प्रति शेअर ४०.५ रुपये इतकी सर्वाधिक बोली लावली. त्याच वर्षी एप्रिलमध्ये कंपनीने ओपन ऑफरद्वारे ३५ रुपये प्रति शेअर या दराने आणखी २०% हिस्सा खरेदी केला. नोव्हेंबर २००३ मध्ये वेदांताने कॉल ऑप्शन वापरून अतिरिक्त १८.९२% हिस्सा विकत घेतला, त्यामुळे हिंदुस्तान झिंकमधील त्यांचा एकूण हिस्सा ६४.९२% झाला. एप्रिल २००० ते नोव्हेंबर २००३ दरम्यान वेदांताने हिंदुस्तान झिंकमधील ६४.९२% हिस्सा मिळवण्यासाठी सुमारे १,००० कोटी रुपयांची गुंतवणूक केली आणि दोन दशकांत हे १,००० कोटी रु. ७०,००० कोटी रु. झाले. ही कामगिरी वॉरेन बफेंच्या बर्कशायर हॅथवेपेक्षाही चांगली आहे.

## कुटुंब : वडिलांचा ॲल्युमिनियम कंडक्टरचा छोटासा व्यवसाय

अनिल अग्रवाल यांचा जन्म बिहारमधील पाटणा शहरातील एका मध्यमवर्गीय मारवाडी कुटुंबात झाला. वडील द्वारकाप्रसाद अग्रवाल ॲल्युमिनियम कंडक्टरचा छोटासा व्यवसाय करत असत. अनिल यांच्यात लहानपणापासूनच व्यवसायाची एक ठिणगी होती. शालेय शिक्षणानंतर उच्च शिक्षण घेण्याऐवजी त्यांनी वयाच्या १५ व्या वर्षी वडिलांना त्यांच्या व्यवसायात मदत करण्यास सुरुवात केली. वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी संधींच्या शोधात ते मुंबईला आले. अनिल अग्रवाल यांचे लग्न किरण अग्रवाल यांच्याशी झाले. त्यांना दोन मुले आहेत - मुलगा अग्निवेश व मुलगी प्रिया. वेदांता ग्रुपच्या पुढच्या पिढीची प्रतिनिधी म्हणून प्रिया आता अनेक प्रकल्पांत सक्रिय भूमिका बजावत आहे.

**रंजक : आजही वेदांताच्या बैठकांमध्ये अनेक कनिष्ठ कर्मचाऱ्यांना नावाने हाक मारतात**

## ध्यास : बाल्कोच्या तपासणीस रात्री एकटेच जात गेले होते

- ते अनेक कनिष्ठ कर्मचाऱ्यांना नावाने ओळखतात- अनिल म्हणतात, प्रत्येक व्यक्ती माझी टीम नव्हे, माझे कुटुंब आहे.
- अधिग्रहणापूर्वी त्यांना 'बाल्को' बद्दल शंका होती. म्हणूनच कोणालाही न सांगता ते स्वतः रात्री छत्तीसगडमधील कारखान्याची पाहणी करण्यासाठी गेले होते.

## यश : २० देशांमध्ये व्यवसाय, १.८० लाख कोटींची कंपनी

- २०२० मध्ये त्यांनी सीएसआरअंतर्गत भारताच्या सामाजिक विकासावर सुमारे ८५०० कोटी रुपये खर्च करण्याची घोषणा केली होती.
- आज त्यांचा व्यवसाय जगातील २० हून अधिक देशांत आहे. त्यांनी १.८० लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त बाजारमूल्याची कंपनी उभारली आहे.

## विशेष : शिक्षण व सामाजिक कार्यासाठी देणगीचा संकल्प

- २०२४ मध्ये वेदांता ग्रुपने राजस्थानमध्ये १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक जाहीर केली होती. यात अक्षय्य ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे.
- अनिल अग्रवाल यांनी त्यांच्या संपत्तीपैकी ७५ टक्के म्हणजे सुमारे २१,००० कोटी रुपये दान करण्याचे वचन दिले आहे. ही रक्कम शैक्षणिक आणि सामाजिक कार्यावर खर्च केली जाईल.